# शोभादर्शक यंत्र (कॅलिडोस्कोप)



1. कोनमापकाच्या साहाय्याने प्रत्येक बाजू 5 सेंटीमीटर असणाऱ्या 10 समभुज त्रिकोणांची एक पट्टी तयार करा. चित्रात दाखवलेल्या तुटक रेषेवर पर्वताची घडी (माउंटन फोल्ड) घाला.




2. चित्रात दाखवल्याप्रमाणे तुटक रेषेवर दरीची घडी (व्हॅलीफोल्ड) घाला.
X ने दाखविलेला त्रिकोण Y त्रिकोणाखाली येईल.




3. X त्रिकोणाला डिंक लावून दरीची घडी घाला व ती Y त्रिकोणाला चिकटवा.



4. शोभादर्शक आता पूर्ण झाला आहे. वर दाखवल्याप्रमाणे त्यावर चित्रे काढा किंवा तुमच्या मनाप्रमाणे नक्षी काढा.




5. नक्षी बदलण्यासाठी केंद्रबिंदूपासून निघणाऱ्या पाच घड्या घाला.




6. E ने दर्शवलेला भाग F ला टेकेल अशी घडी घाला.




7. आता वरून उघडलेत तर नवी बाजू बाहेर येईल आणि तुम्हाला वेगळीच नक्षी दिसेल.




8. शोभादर्शक वेगवेगळ्या प्रकारांनी उघडा आणि नवी नक्षी तयार करा.

9. शोभादर्शक उलटे करा. वेगळ्या बाजूने उघडा आणि नवी नक्षी तयार करा. एकदा नक्षी कशी बदलायची हे लक्षात आले, की तुम्ही तुमचे स्वतःचे रंगीत पुस्तकही तयार करू शकाल.